# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- ३४७** **दिनांक :- १५/१२/२०२१**

**वेश्याव्यवसायावर छापा कारवाई करुन ०२ मुलींची सुटका-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाची कारवाई.**

दिनांक १३-१२-२०२१ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाचे पोलीस अंमलदार उमेश पाटील यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मिरारोड पूर्व येथे राहणारा इसम नामे सुधीर हा वेश्यागमनाच्या मोबदल्यात गिऱ्हाईकांना मिरा-भाईंदर परिसरातील लॉजमध्ये मुली पुरवितो.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. एस. एस. पाटील यांनी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना जलाजा लॉज आवारात, मच्छी मार्केट, मिरा-भाईंदर रोड, मिरारोड पूर्व या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह दिनांक १३-१२-२०२१ रोजी १८.४० वा. छापा टाकला असता दयाली उर्फ सुधीरचरण साव वय-३६ वर्ष, रा. गणेशनगर चाळ, शिवसेना गल्ली, बोरीवली पुर्व, मुंबई, मुळ रा. ग्राम- बारीसाकी, ता. जि. चत्रा राज्य- झारखंड हा वेश्यागमनाच्या मोबदल्यात पुरुष गि-हाईकांना मुली पुरवित असतांना मिळुन आल्याने सदर बाबत पोहवा/२२६९ उमेश हरी पाटील यांनी सरकारतर्फे फिर्याद दिल्याने आरोपी १) दयाली उर्फ सुधीरचरण साव याचे विरुध्द नयानगर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ४७३/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३७० सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. श्री. संपतराव पाटील, पो.हवा. उमेश पाटील, विजय निलंगे, पो.अंम. केशव शिंदे, मपोना वैष्णवी यंबर, मपोशि सुप्रिया तिवले, चा. पोना गावडे सर्व नेम. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

---ooo---